www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Test Booklet Code & No.
प्रश्नपत्रिका कोड व क्र.

**D**

# Paper-III
# PSYCHOLOGY

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ..........................................

   (Name) ................................................

2. (Signature) ..........................................

   (Name) ................................................

Seat No. ☐☐☐☐☐☐

(In figures as in Admit Card)

Seat No. ..............................................................

(In words)

OMR Sheet No. ☐☐☐☐☐☐

(To be filled by the Candidate)

## MAY - 13316

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

Number of Pages in this Booklet : **48** Number of Questions in this Booklet : **75**

### Instructions for the Candidates

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **75** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-III will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

### विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 75 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा.** : जर (C) हे योग्य उत्तर असेल तर
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

www.prepp.in

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

MAY - 13316/III—D

# PSYCHOLOGY
## Paper III
## मानसशास्त्र
## प्रश्नपत्रिका III

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

**Note :** This Question Paper contains **Seventy Five (75)** multiple choice questions, each question carries **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पचहत्तर (75)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

**Question Nos. 1 to 6 :**

In the following questions, each question has two statements — Assertion (A) and Reason (R). Read each question carefully and decide whether Assertion and Reason are individually correct or not, and if they are correct, whether the Reason is a valid explanation of the Assertion. For each question, before the corresponding question number, indicate your answer using the following codes :

(A) Both (A) and (R) are true and (R) is the correct explanation of (A)

(B) Both (A) and (R) are true but (R) is not the correct explanation of (A)

(C) (A) is true but (R) is false

(D) (A) is false but (R) is true

**प्रश्न क्र. 1 ते 6 :**

खालील प्रश्नांमध्ये, प्रत्येक प्रश्नात दोन वाक्ये आहेत — विधान (Assertion or A) आणि कारण (Reason or R). प्रत्येक प्रश्न काळजीपूर्वक वाचा. विधान आणि कारण स्वतंत्रपणे बरोबर आहेत की नाही ते ठरवा आणि ती बरोबर असतील तर कारण हे विधानाचे यथार्थ स्पष्टीकरण आहे का ते ठरवा. प्रत्येक प्रश्नासाठी त्याच्या योग्य प्रश्नक्रमांकासमोर खालील संकेतन वापरून आपले उत्तर दर्शवा :

(A) विधान (A) व कारण (R) दोन्ही सत्य आहेत आणि कारण (R) हे विधानाचे योग्य स्पष्टीकरण आहे

(B) विधान (A) व कारण (R) दोन्ही सत्य आहेत पण कारण (R) हे विधानाचे बरोबर स्पष्टीकरण नाही

(C) विधान (A) सत्य आहे पण कारण (R) हे चूक आहे

(D) विधान (A) चूक आहे पण कारण (R) हे सत्य आहे

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



1. **Assertion (A) :**

The use of paper-pencil self-report personality inventories is questionable in personnel selection.

**Reason (R) :**

In selection situation, self-report per-sonality inventories are highly sus-ceptible to the influence of acquiescence response set.

2. **Assertion (A) :**

Separation of patients helps to resolve a folie à deux.

**Reason (R) :**

One of the two patients in a folie à deux have not developed a true psychotic condition.

1. **विधान (A) :**

कर्मचारी निवडीत कागद-पेन्सिल स्व-वृत्त व्यक्तिमत्त्व सूचींचा उपयोग विवादास्पद आहे.

**कारण (R) :**

निवडीवेळी, स्व-वृत्त व्यक्तिमत्त्व सूचींवर अनुसंमती अनुक्रिया न्यासाचा बराच परिणाम होतो.

2. **विधान (A) :**

रुग्णांचे विलगीकरण फोली अ ड दूर करण्यात मदत करते.

**कारण (R) :**

फोली अ ड मधील एका व्यक्तीत खऱ्या अर्थी दुर्मनस्कता विकसित झालेली नसते.

www.prepp.in



3. **Assertion (A) :**

Individuals with high levels of biological arousal are more vulnerable for aggression.

**Reason (R) :**

The social-cognitive model argues that low arousal individuals are less likely to experience negative affect while evaluating aggressive scripts.

4. **Assertion (A) :**

Probability of 'Linda is a banker and feminist activist' is judged higher than probability of 'Linda is a banker'.

**Reason (R) :**

Humans often form mental 'search sets' to estimate how frequent are members of some class, also known as effectiveness of a search set, creates availability heuristics.

3. **विधान (A) :**

जैविक उत्तेजनाची पातळी अधिक असलेल्या व्यक्ती या आक्रमकतेसाठी अधिक प्रवृत्त असतात.

**कारण (R) :**

सामाजिक-बोधनात्मक प्रारूपानुसार आक्रमक स्क्रिप्टचे मूल्यमापन करताना उत्तेजन पातळी कमी असलेल्या व्यक्ती ऋणात्मक भावस्थिती अनुभवण्याची शक्यता कमी असते.

4. **विधान (A) :**

'लिंडा ही बँक संचालक आहे आणि स्त्रीवादी कार्यकर्ती आहे' याची संभाव्यता 'लिंडा ही बँक संचालक आहे' याच्या संभाव्यतेपेक्षा अधिक सांगितली जाते.

**कारण (R) :**

एखाद्या समूहातील सदस्यांच्या वारंवारीतेचा अंदाज लावण्यासाठी माणसे बऱ्याचदा 'सर्च सेट' वापरतात. सर्च सेटच्या परिणामकारकतेमुळे उपलब्धता नवगामी निर्माण होते.

www.prepp.in



5. **Assertion (A) :**

REM sleep deprivation leads to rebound phenomena.

**Reason (R) :**

REM sleep has more functions than slow wave sleep.

6. **Assertion (A) :**

In attitude scaling by method of equal appearing intervals, median is usually used as a method of getting scale values.

**Reason (R) :**

Mean, median and mode are same in normal distribution.

5. **विधान (A) :**

जलद नेत्रचल निद्रेच्या वंचिततेमुळे 'रीबाऊंड फिनॉमेना' दिसते.

**कारण (R) :**

जलद नेत्रचल निद्रेची, मंद गती लहर निद्रेपेक्षा जास्त कार्ये असतात.

6. **विधान (A) :**

समदर्शी अंतराल पद्धतीने अभिवृत्ती-मापनीकरण करतांना मापन-मूल्य मिळविण्याकरिता बहुधा मध्यक (मिडिअन) वापरले जाते.

**कारण (R) :**

प्रसामान्य वितरणात मध्य (मिन), मध्यक (मिडिअन) आणि बहुलक (मोड) सारखेच असतात.

www.prepp.in



7. Match List I with List II and select the correct answer using the codes given below :

**List I**

**(Error)**

(P) Fundamental Attribution Error

(Q) Actor-observer effect

(R) Self-serving bias

(S) Self-fulfilling prophecy

**List II**

**(Description)**

(1) Attributing own behaviour to situational and others to internal causes

(2) A prediction that causes itself to occur

(3) Overestimation of dispositional causes for others behaviours

(4) Attributing own behaviour to situational and overestimating dispositional cases for others

(5) Attributing our positive outcomes to dispositional causes and our own negative outcomes to situational ones

**Codes :**

| | (P) | (Q) | (R) | (S) |
|---|---|---|---|---|
| (A) | (3) | (1) | (4) | (2) |
| (B) | (4) | (2) | (5) | (3) |
| (C) | (3) | (1) | (5) | (2) |
| (D) | (4) | (3) | (2) | (1) |

7. यादी I व यादी II यातील जोड्या लावा आणि खालील दिलेल्या संकेतांकामधून योग्य उत्तर निवडा :

**यादी I**

**(प्रमाद)**

(P) मूलभूत गुणानूरोपण प्रमाद

(Q) कर्ता-निरीक्षक परिणाम

(R) सेल्फ-सर्व्हिंग अभिनती

(S) स्व-अनुकूलता प्रॉफेसी

**यादी II**

**(वर्णन)**

(1) आपले वर्तन परिस्थितीला आणि इतरांचे वर्तन अंतर्गत घटकांना अनुरोपण करणे

(2) पूर्वकथन जे स्वत:चेच कारण आहे

(3) इतरांच्या वर्तनाच्या व्यक्तिनिष्ठ कारणांचे अतिगणन करणे

(4) स्वताच्या वर्तनाला परिस्थितीमध्ये गुणारोपीत करणे व इतरांच्या वर्तनाच्या व्यक्तिसापेक्ष कारणांचे अतिगणन करणे

(5) आपल्या धनात्मक निष्पत्तीचे व्यक्तिसापेक्ष व ऋणात्मक निष्पत्तीचे परिस्थितीजन्य गुणानुरोपण करणे

**संकेतांक :**

| | (P) | (Q) | (R) | (S) |
|---|---|---|---|---|
| (A) | (3) | (1) | (4) | (2) |
| (B) | (4) | (2) | (5) | (3) |
| (C) | (3) | (1) | (5) | (2) |
| (D) | (4) | (3) | (2) | (1) |

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



8. Closure, nearness, similarity and continuation are categories of :

(A) Cognitive style
(B) Cognitive organization
(C) Perceptual integration
(D) Perceptual organization

9. Match List I with List II and select the correct answer by using the codes given below :

**List I**
**(Type of Correlation)**

(P) Partial correlation
(Q) Phi coefficient
(R) Point biserial correlation
(S) Spearman rho

**List II**
**(Brief Explanation)**

(1) Correlation between a dichotomous variable and a continuous variable
(2) Correlation of a variable with a set of other variables
(3) Correlation between two variables measured on or transformed to ordinal scale
(4) Correlation between two variables after removing the influence of extraneous variable/s
(5) Correlation between two dichotomous variables

**Codes :**

| | (P) | (Q) | (R) | (S) |
|---|---|---|---|---|
| (A) | (4) | (5) | (1) | (3) |
| (B) | (2) | (5) | (1) | (3) |
| (C) | (4) | (1) | (5) | (2) |
| (D) | (2) | (5) | (3) | (4) |

8. बंदिस्तता, समीपता, समानता आणि निरंतरता हे कशाचे प्रवर्ग आहेत ?

(A) बोधन शैली
(B) बोधन संघटन
(C) संवेदन संकलपन
(D) संवेदन संघटन

9. यादी I व यादी II यातील जोड्या लावून खाली दिलेल्या संकेतांकामधून योग्य उत्तर निवडा :

**यादी I**
**(सहसंबंध प्रकार)**

(P) आंशिक सहसंबंध
(Q) फाय गुणांक
(R) बिंदु-द्विश्रेणीक सहसंबंध
(S) स्पिअर्मन ऱ्हो

**यादी II**
**(संक्षिप्त स्पष्टीकरण)**

(1) एक द्विभाजित परिवर्त्य व एक सलग परिवर्त्य यामधील सहसंबंध
(2) एका परिवर्त्याचा इतर परिवर्त्यांच्या संचाशी सहसंबंध
(3) क्रमवाचक मापनीत असलेल्या किंवा तिच्यात रूपांतरित केलेल्या दोन परिवर्त्यां-मधील सहसंबंध
(4) बाह्य परिवर्त्य/परिवर्त्यांच्या प्रभाव काढल्यानंतर दोन परिवर्त्यांमधील सहसंबंध
(5) दोन द्विभाजित परिवर्त्यांमधील सहसंबंध

**संकेतांक :**

| | (P) | (Q) | (R) | (S) |
|---|---|---|---|---|
| (A) | (4) | (5) | (1) | (3) |
| (B) | (2) | (5) | (1) | (3) |
| (C) | (4) | (1) | (5) | (2) |
| (D) | (2) | (5) | (3) | (4) |

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



10. The three components of Guilford's SOI model are :

(A) Product, Procedures, Content

(B) Operation, Content, Product

(C) Operation, Content and Transformations

(D) Content, Product and Concepts

**Question Nos. 11 to 15 :**

Read the following paragraph and answer the *five* questions **11-15** that follow :

The human and animal behaviour can be examined from the perspective of its adaptation value. Rats allowed to drink a novel-tasting fluid (Saccharin flavoured water) and made sick hours later by a durg injection learned to avoid drinking the flavoured water. The aversion was always to the most recent novel substance, not the familiar tap water

10. गिल्फर्डच्या एस.ओ.आय. प्रारूपातील तीन घटक म्हणजे :

(A) प्रोडक्ट, प्रोसिजर, कंटेंट

(B) ऑपरेशन, कंटेंट, प्रोडक्ट

(C) ऑपरेशन, कंटेंट, ट्रान्सफॉरमेशन

(D) कांटेंट, प्रोडक्ट आणि कॉन्सेप्ट

**प्रश्न क्र. 11 ते 15 :**

खाली दिलेला परिच्छेद वाचा आणि त्याखाली दिलेल्या **पाच** (11–15) प्रश्नांचे उत्तर द्या :

मानवी तसेच प्राणी वर्तन त्या वर्तनाच्या प्रतियोजनात्मक मूल्यांच्या दृष्टिकोनातून अभ्यासता येते.

उंदरांना जेव्हा नवीन चवीचे गोड (सॅक्रीन मिसळलेले) पाणी पिऊ देऊन, त्यानंतर औषधी इंजेक्शनद्वारा आजारी पाडले, तेव्हा ते गोड पाणी टाळायला शिकले. सर्वात शेवटी खाल्लेल्या नवीन पदार्थाविषयीच ही परावृत्ती होती, त्यानंतर प्यालेल्या परिचित नळाच्या पाण्याविषयी नव्हे. दुसऱ्या एका प्रयोगात,

www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide



they drank later. In another experiment rats were given saccharin water while they heard a click. Later they were shocked or made ill with a drug. Shocked rats tried to avoid the click, but drank sweet water. Sickened rats avoided the sweet water but did not run from the click. Rats are omnivores who sample new foods, but easily become baitshy. They seem to adaptively associate taste with illness and external cues with external threats.

11. The findings of the above study illustrates the principles of :

(A) Operant conditioning

(B) Extinction and spontaneous recovery

(C) Evolutionary psychology

(D) Equipotentiality

'क्लिक्' आवाज ऐकतेवेळी उंदरांना गोड पाणी दिले व नंतर त्यांना विजेचा धक्का किंवा आजारपण भोगू दिले. ज्या उंदरांना विजेचा धक्का दिला ते 'क्लिक्' आवाज टाळू लागले, पण गोड पाणी प्यायले. आजारी उंदरांनी गोड पाणी टाळले पण 'क्लिक्' टाळली नाही. उंदीर हे नवीन खाद्य चारवून पहाणारे सर्वभक्षक असतात व आमिष टाळतात. ते आजारपणाचा चवीशी व परिवेश संकेतांचा धोक्याशी संबंध जुळवतात असे दिसते.

11. वरील अभ्यासामधील फलिते कशाची तत्त्वे स्पष्ट करतात ?

(A) व्यापारक अभिसंधान

(B) विलोपन व सहज पुन:प्राप्ती

(C) उत्क्रांती मानसशास्त्र

(D) समविभवता

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



12. Which one of the following statements maximally contradicts the principles of evolutionary psychology ?

(A) "Pigeon, rat, monkey which is which ? It doesn't matter."

—B.F. Skinner

(B) Different evolutionary history of organisms and the ecological problems they solve, shape their responses

(C) Trial and error learning is found in animals at different levels of evolution

(D) Useless behaviours die away or extinguish

13. The second experiment described in the passage would require a :

(A) Correlational design

(B) Latin square design

(C) Three-factor design

(D) Two-factor design

12. खालीलपैकी कोणते विधान उत्क्रांतीवादी मानसशास्त्रीय तत्त्वांच्या विरोधी आहे ?

(A) ''कबुतर, उंदीर, माकड, कोणते कोण ? काही फरक पडत नाही''—बी.एफ. स्किनर

(B) प्रत्येक जीवाचा उत्क्रांती इतिहास व जगण्यासाठी सोडवलेल्या परिस्थितीजन्य अडचणी ह्यामुळे त्यांच्या प्रक्रिया आकार घेतात

(C) उत्क्रांतीच्या विविध पातळ्यांवरील प्राण्या-मध्ये प्रयत्नप्रमाद अध्ययन दिसते

(D) निरूपयोगी वर्तन लोप पावते किंवा त्याचा विसर पडतो

13. दुसऱ्या प्रयोगाला ह्याची गरज भासेल :

(A) सहसंबंध आखणी

(B) लॅटिन स्क्वेअर आखणी

(C) त्रिघटक आखणी

(D) द्विघटक आखणी

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



14. The first experiment in the passage raises the question about the importance of :

(A) Adaptation

(B) Evolutionary psychology

(C) Contiguity

(D) US-CS associations

15. Choose the most likely statement based on the above passage :

(A) Shocked rats may never drink sweet water again

(B) Shocked rats may drink sweet water when conditioning fades

(C) Shocked rats may avoid click as well as saccharine

(D) Sick rats may conclude "It must have been something, I ate"

14. परिच्छेदातला पहिला प्रयोगामुळे पुढीलपैकी कशाच्या महत्त्वबद्दल प्रश्न निर्माण होतो ?

(A) प्रतियोजन

(B) उत्क्रांतीवादी मानसशास्त्र

(C) सान्निध्य

(D) अनुकूलित उद्दीपक व अभिसंधिक उद्दीपक ह्यातील साहचर्य

15. वरील परिच्छेदाच्या आधारे खालीलपैकी सर्वात संभाव्य वाक्य निवडा :

(A) शॉक दिलेले उंदीर परत कधी गोड पाणी पिणार नाहीत

(B) शॉक दिलेले उंदीर अभिसंधानाचा परिणाम घटल्यावर गोड पाणी पितील

(C) शॉक दिलेले उंदीर गोड पाणी व 'क्लिक' दोन्ही टाळतील

(D) आजारी उंदीर असा निष्कर्ष काढतील ''माझ्या खाण्यात काहीतरी आले असणार''

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



16. According to Maslow, which of the following are correct in case of B-needs ?
    (1) Biographical analysis method was used to understand B-needs
    (2) Metapathologies are result of lack fulfillment of B-needs
    (3) Esteem and actualization are B-needs
    (4) Once fulfilled B-needs do not remain salient

    Select the correct answer from the codes given below :

    **Codes :**
    (A) (1) and (2)
    (B) (3) and (4)
    (C) (2) and (4)
    (D) (1), (2) and (3)

17. Which among the following is true in case of Arthur Jensen's view about intelligence ?
    (1) Jensen is a major proponent of *g*-factor model
    (2) Jensen argued level II abilities are distributed equally among all
    (3) Argued that IQ is largely inherited and cannot be increased
    (4) He recently supported multiple intelligence view

    Select the correct answer from the codes given below :

    **Codes :**
    (A) (1) and (3) only
    (B) (2) and (4) only
    (C) (2) and (3) only
    (D) (1), (2) and (3) only

16. मॅस्लोअनुसार बी-गरजांबाबत खालीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?
    (1) बी-गरजांच्या आकलनासाठी चरित्रात्मक विश्लेषण पद्धती वापरली गेली
    (2) अधिविकृती या बी-गरजा पूर्ण न झाल्याने होतात
    (3) आदर आणि आत्मवास्तविकीकरण या बी-गरजा आहेत
    (4) एकदा पूर्ण झाल्यावर बी-गरजा महत्त्वपूर्ण राहत नाहीत

    खाली दिलेल्या संकेतांकामधून योग्य पर्याय निवडा :

    **संकेतांक :**
    (A) (1) आणि (2)
    (B) (3) आणि (4)
    (C) (2) आणि (4)
    (D) (1), (2) आणि (3)

17. अर्थर जेन्सनच्या बुद्धीमत्तेविषयक दृष्टीकोनाबाबत खालीलपैकी कोणती विधान बरोबर आहे ?
    (1) जेन्सन हा जी-घटकाचा मुख्य समर्थक आहे
    (2) जेन्सनच्या मतानुसार दुसऱ्या स्तरावरील क्षमता या सर्वांमध्ये सारख्या वितरीत असतात
    (3) त्याने असे मत मांडले की बुद्ध्यांक हा मोठ्या प्रमाणात आनुवंशिक आहे आणि वाढवता येत नाही
    (4) त्याने सध्या बहुविध बुद्धीमत्ता सिद्धांताला पुष्टी दिली आहे

    खाली दिलेल्या संकेतांकामधून योग्य पर्याय निवडा :

    **संकेतांक :**
    (A) (1) आणि (3) फक्त
    (B) (2) आणि (4) फक्त
    (C) (2) आणि (3) फक्त
    (D) (1), (2) आणि (3) फक्त

www.prepp.in



18. A fourth test was added to an established selection test battery of three tests. The old and new versions were correlated to an external criterion of job proficiency. The significant change in $R^2$ provides an evidence for :

(A) construct validity of the fourth test

(B) incremental validity of the fourth test

(C) internal consistency of the fourth test with the earlier three tests

(D) reliability of the selection test battery of the four tests

19. Nystagmus as a symptom of substance abuse involves :

(A) Ears

(B) Skin

(C) Eyes

(D) Heart

18. तीन चाचण्या असलेल्या एका निवडचाचणीच्या बॅटरीत, चौथ्या चाचणीचा समावेश करण्यात आला. बॅटरीच्या जुन्या व नवीन व्हर्शन्सचे कार्य-नैपुण्यतेच्या एका बाह्य घटकाशी सहसंबंध काढण्यात आले. या संदर्भात लक्षणीय $R^2$ काय दर्शविते ?

(A) चौथ्या चाचणीची संकल्पनात्मक यथार्थता

(B) चौथ्या चाचणीची वर्धी यथार्थता

(C) चौथ्या चाचणीची इतर तीन चाचण्यांशी अंतर्गत सुसंगतता

(D) चार चाचण्यांच्या निवडचाचणी बॅटरीची विश्वसनीयता

19. अंमली पदार्थ सेवनाच्या चिन्हांपैकी निस्टॅग्मस् ह्या चिन्हात ह्या अवयवावर परिणाम होतो :

(A) कान

(B) त्वचा

(C) डोळे

(D) हृदय

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



20. Match List I with List II and select the correct answer using the codes given below :

**List I**

**(Design)**

(P) Factorial design

(Q) Block design

(R) Single-factor repeated measures design

(S) Time series design

**List II**

**(Features)**

(1) Each subject participates under all experimental conditions

(2) Suitable for studying the interactions among the independent variables

(3) Studies the same set of experimental units on several occasions

(4) Subjects matched on some extraneous variable related to the DV

(5) Experiment with more than two IVs

**Codes :**

| | (P) | (Q) | (R) | (S) |
|---|---|---|---|---|
| (A) | (2) | (4) | (3) | (1) |
| (B) | (5) | (4) | (1) | (3) |
| (C) | (2) | (4) | (1) | (3) |
| (D) | (5) | (4) | (3) | (1) |

20. यादी I व यादी II यातील जोड्या लावा आणि खाली दिलेल्या संकेतांकामधून योग्य उत्तर निवडा :

**यादी I**

**(आखण्या)**

(P) घटकानुसारी आखणी

(Q) ब्लॉक आखणी

(R) एक-घटक पुनरावर्तित मापन आखणी

(S) काल-क्रमिका आखणी

**यादी II**

**(वैशिष्ट्ये)**

(1) प्रत्येक प्रयुक्त सर्व प्रायोगिक स्थितींमध्ये सहभागी होतो

(2) स्वतंत्र परिवर्त्यांमधील अंतर्क्रियांचा अभ्यास करण्यास योग्य

(3) त्याच प्रायोगिक एककांचा अनेकवेळा अभ्यास केला जातो

(4) आश्रित परिवर्त्याशी संबंधित बाह्य परिवर्त्यावर प्रयुक्ताचे अनुरूपण केले जाते

(5) दोनपेक्षा अधिक स्वतंत्र परिवर्त्य असलेला प्रयोग

**संकेतांक :**

| | (P) | (Q) | (R) | (S) |
|---|---|---|---|---|
| (A) | (2) | (4) | (3) | (1) |
| (B) | (5) | (4) | (1) | (3) |
| (C) | (2) | (4) | (1) | (3) |
| (D) | (5) | (4) | (3) | (1) |

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



21. Which of the following statement/s is/are true about culture fair tests ?

    (1) They attempt to minimize the use of language

    (2) They attempt to assess the effects of culture on people's intellectual and creative skills

    (3) Suitable different versions of the test are devised for different cultural groups

    (4) They are composed of materials to which all socio-cultural groups have been presumably exposed

    **Codes :**

    (A) (1) only

    (B) (1) and (4) only

    (C) (1), (2) and (3) only

    (D) (2), (3) and (4) only

22. A competent and well-performing female middle-level manager did not consider herself as suitable for the position of senior manager thinking that females are not suitable for such high positions. This is a typical example of :

    (A) high motivation to avoid failure

    (B) gender discrimination

    (C) low motivation to approach success

    (D) glass-ceiling phenomenon

21. संस्कृती निर्दोष चाचण्यांच्या संदर्भात कोणती/कोणते विधान/विधाने खरी आहेत ?

    (1) त्या भाषेचा वापर कमीत कमी करतात

    (2) त्या संस्कृतीचा लोकांच्या बौद्धिक व सर्जनात्मक कौशल्यांवर काय परिणाम होतो यांचे मूल्यांकन करतात

    (3) विविध सांस्कृतिक समूहांसाठी चाचणीच्या वेगळ्या आवृत्त्या तयार करतात

    (4) सर्व सामाजिक-सांस्कृतिक समूहांना परिचित असलेल्या साहित्यापासून त्यांची रचना केली जाते

    **संकेतांक :**

    (A) (1) फक्त

    (B) (1) आणि (4) फक्त

    (C) (1), (2) आणि (3) फक्त

    (D) (2), (3) आणि (4) फक्त

22. एक सक्षम व उत्तम कार्य करणारी मध्यस्तरीय महिला व्यवस्थापक स्वत:ला उच्चस्तरावर काम करण्यासाठी अयोग्य मानत होती. इतक्या उच्चपदावर महिला काम करू शकत नाहीत असा तिचा समज होता. हे प्रामुख्याने कसले उदाहरण आहे ?

    (A) अपयश टाळण्याची प्रेरणा

    (B) लिंग विभेदन

    (C) यश संपादित करण्याची कमी प्रेरणा

    (D) ग्लास सीलिंग फिनॉमिनन

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



23. Match List I with List II and select the correct answer from the codes given below :

**List I**

**(Projective Test)**

(P) TAT

(Q) Rorschach

(R) CAT

(S) RPFS

**List II**

**(Characteristic)**

(1) Uses animal drawings

(2) Aggression measurement

(3) Exner scoring system

(4) Analysis of stories

**Codes :**

| | (P) | (Q) | (R) | (S) |
|---|---|---|---|---|
| (A) | (4) | (3) | (1) | (2) |
| (B) | (2) | (3) | (1) | (4) |
| (C) | (3) | (4) | (1) | (2) |
| (D) | (4) | (2) | (3) | (1) |

23. यादी I व यादी II यातील जोड्या लावा आणि खाली दिलेल्या संकेतांकामधून योग्य उत्तर निवडा :

**यादी I**

**(प्रक्षेपण चाचणी)**

(P) टी.ए.टी.

(Q) रोर्शा

(R) सी.ए.टी.

(S) आर.पी.एफ.एस.

**यादी II**

**(गुणवैशिष्ट्य)**

(1) प्राण्यांच्या चित्रांचा वापर

(2) आक्रमकतेचे मापन

(3) एक्सनरची गुणांकन पद्धती

(4) गोष्टींचे विश्लेषण

**संकेतांक :**

| | (P) | (Q) | (R) | (S) |
|---|---|---|---|---|
| (A) | (4) | (3) | (1) | (2) |
| (B) | (2) | (3) | (1) | (4) |
| (C) | (3) | (4) | (1) | (2) |
| (D) | (4) | (2) | (3) | (1) |

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



24. The following are the acronyms for diagnostic classification for clinical disorders :

(1) ICD

(2) DSM

(3) RDC

(4) LPS

Select the correct answer from the codes given below :

**Codes :**

(A) (1) and (2) only

(B) (2) and (3) only

(C) (1), (2) and (3) only

(D) (1), (2) and (4) only

25. Which of the following is/are measure/s of originality ?

(1) Consequences

(2) TTCT-Figural

(3) Alternative uses

(4) Word fluency

Select the correct answer from the codes given below :

**Codes :**

(A) (2) only

(B) (2) and (3) only

(C) (3) and (4) only

(D) (1), (2) and (3) only

24. खालील अक्षरे मानसिक आजारांच्या वर्गीकरणाची निर्देशक अद्याक्षरे आहेत :

(1) आय.सी.डी.

(2) डी.एस.एम.

(3) आर.डी.सी.

(4) एल.पी.एस.

खाली दिलेल्या संकेतांकामधून योग्य पर्याय निवडा :

**संकेतांक :**

(A) (1) आणि (2) फक्त

(B) (2) आणि (3) फक्त

(C) (1), (2) आणि (3) फक्त

(D) (1), (2) आणि (4) फक्त

25. खालीलपैकी कोणते मौलिकतेचे मापक आहे/आहेत ?

(1) कॉन्सिक्वेन्सेस्

(2) टी.टी.सी.टी.-फिगरल

(3) आल्टरनेटिव्ह युसिस्

(4) वर्ड फ्लुअन्सी

खाली दिलेल्या संकेतांकामधून योग्य पर्याय निवडा :

**संकेतांक :**

(A) (2) फक्त

(B) (2) आणि (3) फक्त

(C) (3) आणि (4) फक्त

(D) (1), (2) आणि (3) फक्त

www.prepp.in



26. Researches on REM sleep have found that greater amount of time is taken up by REM sleep in one of the stages :

(A) Infancy

(B) Childhood

(C) Adulthood

(D) Old age

27. In which of the following stages, the quality of one's friendship become one of the strongest determinants of self-esteem ?

(A) Childhood

(B) Adolescence

(C) Adulthood

(D) Old age

26. REM निद्रेवरील केलेल्या संशोधनातून दिसून येते कि खालीलपैकी एका अवस्थेत, निद्रेचा मोठा भाग REM निद्रेचा असतो :

(A) अर्भकावस्था

(B) बाल्यावस्था

(C) प्रौढावस्था

(D) वृद्धावस्था

27. खालीलपैकी कोणत्या अवस्थेत, मैत्रीची गुणवत्ता, स्व-आदराच्या बलशाली निर्धारकांपैकी एक आहे ?

(A) बाल्यावस्था

(B) कुमारावस्था

(C) प्रौढावस्था

(D) वृद्धावस्था

www.prepp.in



28. Which of the following is/are the content theory/theories of work-motivation ?

(1) Alderfer's ERG theory

(2) Herzberg's two-factor theory of work motivation

(3) McClelland's theory of needs

(4) Porter and Lawler's performance satisfaction theory

Select the correct answer from the codes given below :

**Codes :**

(A) (2) only

(B) (2) and (3) only

(C) (1), (2) and (3) only

(D) (1), (2) and (4) only

28. पुढीलपैकी कोणती/कोणत्या कार्यप्रेरणाची/च्या आशय उपपत्ती आहे/आहेत ?

(1) अॅल्डरफरची ERG उपपत्ती

(2) हर्झबर्गचा कार्यप्रेरणेचा द्विघटक सिद्धांत

(3) मॅक्लीलँडची गरज उपपत्ती

(4) पोर्टर आणि लालरची निवर्तन समाधान उपपत्ती

खाली दिलेल्या संकेतांकामधून योग्य पर्याय निवडा :

**संकेतांक :**

(A) (2) फक्त

(B) (2) आणि (3) फक्त

(C) (1), (2) आणि (3) फक्त

(D) (1), (2) आणि (4) फक्त

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



29. Cued recall test confirm that loss of information from LTM is due to problem of :

(A) Encoding of information

(B) Storage of information

(C) Availability of information

(D) Accessibility of information

30. Which is/are correct about the analogy theory of syllogistic reasoning ?

(1) It uses only abstract syllogisms

(2) It uses only concrete syllogisms

(3) Premises are represented as mental models

(4) People initially test representations by searching counter-instances

Select the correct answer from the codes given below :

**Codes :**

(A) (2) only

(B) (2) and (3) only

(C) (1), (3) and (4) only

(D) (2), (3) and (4) only

29. सूचक प्रत्यावहन चाचणी हे पुष्ट करते की दीर्घकालिक स्मृतीतून माहितीचे विलोपन खालील समस्येमुळे होते :

(A) माहितीचे संकेतन

(B) माहितीचा साठा

(C) माहितीची उपलब्धता

(D) माहितीची सुगमता

30. संवाक्य तर्काच्या सादृष्यानुमान सिद्धांताबाबत खालीलपैकी कोणते बरोबर आहे ?

(1) ते फक्त अमूर्त संवाक्यांचा वापर करतात

(2) ते फक्त मूर्त संवाक्यांचा वापर करतात

(3) आधारविधानांना मानसिक प्रतिरूप म्हणून प्रतिरूपण करण्यात येते

(4) लोक सुरुवातीला प्रतिरूपणाची चाचणी विरोधी उदाहरणे शोधून करतात

खालील दिलेल्या संकेतांकामधून योग्य पर्याय निवडा :

**संकेतांक :**

(A) (2) फक्त

(B) (2) आणि (3) फक्त

(C) (1), (3) आणि (4) फक्त

(D) (2), (3) आणि (4) फक्त

www.prepp.in



31. The flashbulb memories that people reported tend to include which of the following categories of information ?

(1) Location

(2) Activity

(3) Source

(4) Emotion

Select the correct answer from the codes given below :

**Codes :**

(A) (1) and (4) only

(B) (1), (2) and (3) only

(C) (1), (3) and (4) only

(D) (1), (2), (3) and (4) only

31. लख्खस्मृतीं (flashbulb)चे अहवालात्मक वर्णन ज्या लोकांनी दिले आहेत, ते लोक खालीलपैकी कोणत्या गटात समाविष्ट होणारी माहिती देतात ?

(1) स्थान

(2) क्रिया

(3) उगम

(4) भावना

खाली दिलेल्या संकेतांकामधून योग्य पर्याय निवडा :

**संकेतांक :**

(A) (1) आणि (4) फक्त

(B) (1), (2) आणि (3) फक्त

(C) (1), (3) आणि (4) फक्त

(D) (1), (2), (3) आणि (4) फक्त

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



32. In the digestive process, insulin is *not* responsible for :

(A) Use of glucose as primary energy source

(B) Conversion of deoxygenated to oxygenated blood

(C) Storage of blood borne fuels

(D) Glycogen storage in liver and muscles

33. In the human brain, the work of processing new information and routing it to parts of the cortex for permanent storage is carried out primarily by :

(A) hippocampus

(B) hypothalamus

(C) hypoglossal nerve

(D) hepatic tissues

32. पचनक्रियेत, इन्स्युलिन ह्यासाठी जबाबदार **नाही** :

(A) ताकदीचा प्राथमिक स्रोत म्हणून ग्लुकोजचा वापर

(B) प्राणवायुविरहित रक्ताचे प्राणवायुयुक्त रक्तात रूपांतर

(C) रक्तातील इंधनाचा साठा

(D) लिव्हर व स्नायु ह्यात ग्लायकोजेनचा साठा

33. मानवी मेंदूत, नवीन माहितीवर प्रक्रिया करण्याचे व बाह्यकांच्या विविध जागी पाठवण्याचे कार्य मुख्यत्वेकरून हा घटक पार पाडतो :

(A) हिप्पोकॅम्पस्

(B) हायपोथॅलॅमस

(C) हायपोग्लॉसल् चेता

(D) हिपॅटिक उती

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



34. Match List I with List II and select the correct answer from the codes given below :

**List I**

**(Theory)**

(P) James-Lange

(Q) Cannon-Bard

(R) Schacter-Singer

(S) Lazarus's cognitive mediation theory

**List II**

**(Explanation)**

(1) Emotion and physiological arousal occur simultaneously

(2) Appraisal of stimulus alone leads to emotional reaction

(3) Physical arousal and cue based label both lead to emotion

(4) Physical arousal leads to emotional labelling

